लोकमत
epaper.lokmat.com
पुणे, गुरुवार, दि. १४ मार्च २०२४


# 'राजगुरू'मध्ये निर्भय कन्या अभियान

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : विद्यार्थिनींनी कोणताही अन्याय, अत्याचार अथवा दबावाला बळी न पडता आपला शारीरिक, बौद्धिक व मानसिक क्षमतांचा विकास करून निर्भयपणे वाटचाल करण्याचे आवाहन खेड पोलिस स्टेशनच्या सहायक पोलिस निरीक्षक स्नेहल गुरव यांनी केले. त्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने आयोजित निर्भय कन्या अभियान कार्यक्रमात स्त्री हक्क - अधिकार विषयक नियम संहिता कायदे, महिला स्वसंरक्षण या विषयावर बोलत होत्या. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, काजल बोऱ्हाडे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. संदीप थोरात, प्राध्यापिका, विद्यार्थिनी उपस्थित होत्या. पोलिस निरीक्षक स्नेहल गुरव यांनी कायद्यांविषयी माहिती दिली. काजल बोऱ्हाडे यांनी महिला स्वसंरक्षण या विषयावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. प्रतिमा लोणारी यांनी, प्रास्ताविक प्रा. संदीप थोरात यांनी, तर आभार प्रा. नीता डोंगरे यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner